**Unit I**

**भारतातील कंपनीच्या राजवटीची स्थापना**

**ब)ऐतदेशिय सत्तांशी संघर्ष बंगाल आणि म्हैसूर**

**प्रस्तावना**

सतराव्या शतकातील युरोपातील पोर्तुगीज, डच व ब्रिटीश भारतामध्ये आले. भारताच्या विविध भूप्रदेशात त्यांनी आपला प्रभाव निर्माण केला. भारतामध्ये आणखी सत्ता निर्माण करताना या युरोपियन सत्ताधीशांच्या मध्ये ही संघर्ष झाला. त्या संघर्षात ब्रिटिशांनी भारतात साम्राज्य निर्माण करता आले. ब्रिटिशांनी भारतामध्ये साम्राज्य प्रस्थापित करण्याच्या कार्याला बंगाल पासून सुरुवात केली. इंग्रज व बंगालचा नवाब सिराजउद्दौला यांच्यामध्ये संघर्ष झाला. 1757 च्या प्लासीच्या लढाईमध्ये इंग्रजांचा विजय झाला. त्यामुळे बंगालमध्ये ब्रिटिश सत्ता स्थिरावली.

**ब्रिटीशांचा बंगालमधील साम्राज्यविस्तार:-**

इंग्रज भारतात आले तेव्हा मोगल सत्ता ही प्रमुख सत्ता होती व बादशाह अकबर राज्य करत होता. मात्र अकबराचा मुलगा व त्याच्या नंतर मुगल सत्तेवर आलेल्या जहांगीरच्या काळात इंग्रजांनी सुरत येथे पश्चिम किनाऱ्यावर आपली पहिली वखार स्थापन केली. व सर्वाचा उल्लेख तत्कालीन कागदपत्रांत 'फॅक्टरी' असा आहे, हे त्यांचे व्यापारी केंद्र होते. 1640 मध्ये त्यांनी सेंट जॉर्ज किल्ला बांधला. बंगालमध्ये हुबळी येथे इंग्रजांची पहिली वखार 1651 मध्ये स्थापन केली गेली. डॉक्टर भाऊ टन या इंग्रज डॉक्टरने मोगलांच्या शाही घराण्यातील महिलेवर केलेल्या उपचाराबद्दल शहा सुजा याने वार्षिक तीनशे रुपयांच्या बदल्यात सबंध बंगाल, बिहार व ओरिसा मध्ये इंग्रजांना मुक्त व्यापार यांची परवानगी दिली. यानंतर या पूर्वेकडील प्रदेशात कासिम बजार, पाटणा, गोविंदपुर (आजचे कोलकाता) इत्यादी ठिकाणी इंग्रजांच्या वखारी स्थापन झाल्या. 1668 मध्ये इंग्लंडचा राजा दुसरा चार्ल्स यांच्या विवाहाच्या निमित्ताने पोर्तुगिजांनी त्यांच्या ताब्यात असलेले मुंबई हे बेट त्यांना आंदण दिले. राजा चार्ल्सने वार्षिक 10 एवढ्या भाडेपट्टीवर मुंबई बेट ईस्ट इंडिया कंपनीला दिले. अशारितीने त्यांना व्यापारी केंद्र व बंदरे म्हणून महत्त्व मिळाले. मुंबई, हुबळी व चेन्नई या तीन ठिकाणी इंग्रजांच्या वखारी स्थापन झाल्या. इंग्रजांनी व्यापाराबरोबरच आपला प्रभाव जमिनीवर व समुद्रावर दोन्ही ठिकाणी वाढविण्याचा प्रयत्न केला.

1707 मध्ये औरंगजेबाच्या मृत्यूनंतर दुबळ्या वारसदारांच्या कारकीर्दीत मोगलांचा बंगालचा सुभेदार मुर्शिदकुली जाफर खान हा जवळ जवळ स्वतंत्र झाला. त्याने बंगालमध्ये नबाबाच्या घराण्याची स्थापना केली. 1727 मध्ये त्याच्या जावई सुजाउद्दोल्लाखान हा बंगाल व ओरिसाच्या सत्तेवर मुर्शिद खान वारसदार म्हणून आला. याच काळात त्याच्या कार्यक्षेत्रात बिहारचा ही समावेश झाला. 1739 मध्ये शुजाउद्दौला च्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा सर्फराजखान हा सत्तेवर आला. परंतु नायब सुभेदार असलेल्या अलीवर्दीखान याने 1740 मध्येच सरफराजखान याचा पराभव करून त्याला ठार मारले व बंगालची सत्ता आपल्या हाती घेतली. अलीवर्दीखान हा उत्कृष्ट प्रशासक होता त्याच्या काळात बंगालची भरभराट झाली. त्याने इंग्रजांशी मित्रत्वाचे संबंध ठेवले होते. तथापि त्याने त्यांच्या वखारीना तटबंदी करण्यास मनाई केली. 1756 मध्ये अलीवर्दीखान याचा मृत्यू झाला.

**बंगालचा नवाब सिराज उद्दौला:-**

अलीवर्दीखान याच्या मृत्यूच्या आधीच बंगालच्या गादीसाठी सत्तासंघर्ष सुरू झाला होता. परंतु अलीवर्दीखानाणे आपल्या सर्वात लहान मुलीचा मुलगा नातू सिराजउद्दौला याची निवड केली. अलीवर्दीखान याच्या मृत्यूनंतर सिराजउद्दौला हा बंगालचा नबाब झाला. त्यावेळी त्यांचे वय 24 वर्षे होते. त्याला राजकारणाचा फारसा अनुभव नव्हता. अलीवर्दीखानाने मृत्यूपूर्वी सिराजउद्दौला यास ब्रिटिशांपासून सावध राहण्याचा सल्ला दिला होता. त्याच्या कारकीर्दीत इंग्रजांशी संघर्ष सुरू झाला. दोघांच्यात खटके उडू लागले यामधून प्लासीच्या लढाईचे ची सुरुवात झाली. ब्रिटिशांनी बंगालमध्ये वर्चस्व निर्माण करण्यासाठी सुरुवातीला प्लासीची लढाई करावी लागली.

**प्लासीच्या युद्धाची कारणे:-**

**1)वखारीच्या तटबंदीचा प्रश्न:-**

इंग्रजांनी आपल्या वखारी भोवती सिराजुद्दो लाच्या परवानगीशिवाय तटबंदी घातली होती. सिराजउद्दौलाचे म्हणणे होते की, इंग्रजांनी आपल्या वखारी भोवती तटबंदी घालण्याची आवश्यकता नव्हती. कारण बंगालमधील जनतेचे संरक्षण करण्याची जबाबदारी नवाबाची म्हणजे सिराजुद्दौलाची होती व ती तो पार पाडण्यास सक्षम होता. शिराजउदोलाने इंग्रजांनी केलेली तटबंदी पाडून टाकण्याची आज्ञा दिली. ती आज्ञा इंग्रजांनी मानली नाही म्हणून सिराजउद्दौलाने जून 1756 मध्ये इंग्रजांविरुद्ध कारवाईला सुरुवात केली.

**2) व्यापारी परवान्याचा गैरवापर:-**

1717 मध्ये मोगल बादशहा फरुकशीअरने कंपनीस जकात मुक्त व्यापाराचे फर्मान दिले होते. तथापि कंपनीचे अधिकारी आपल्या खासगी व्यापारासाठी या फर्मानाचा वापर करून विना जकात व्यापार करत होते. त्यामुळे बंगालच्या सुभेदाराचे उत्पन्न बुडत होते.

**3)सिराजउद्दौलाच्या शत्रूंना ब्रिटिशांचा आश्रय:-**

नवाब सिराजउद्दौलाच्या शत्रूना इंग्रज आश्रय देत असत. त्यांच्या मधील संघर्षाचे हे एक महत्त्वाचे कारण होते. बंगालच्या महसूलामध्ये भ्रष्टाचार केल्याचा आरोप असलेला व सीराज विरुद्ध कारस्थाने करणारा कृष्णदासला इंग्रजांनी आश्रय दिला होता. तसेच भ्रष्टाचाराचा आरोप असलेल्या नवझीसखान यास विलियम या इंग्रज अधिकाऱ्याने आपल्या वखारीत आश्रय दिला होता. सिराज उद्दौलाचा नात्यातील घरटी बेगमला बंगालच्या बंगालची नवाबी आपल्या मुलाला मिळावी असे वाटत होते. तिला ही कंपनीने आपल्या वखारीत आश्रय दिला होता. या सर्व कारणांमुळे सिराज उद्दौला व कंपनी यांचे संबंध बिघडले.

**4) कलकत्त्याची अंधारकोठडी:-**

ब्रिटिशांनी कलकत्ता व इतरत्र आपल्या वखारीत तटबंदी केली होती. ती पाडून टाकण्याची नवाबाची आज्ञा पाळली नाही. आपला हुकूम न मानणाऱ्या ब्रिटिशांना शिक्षा करण्यासाठी सिराज उद्दौलाने फौजेनिशी इंग्रजांवर चाल केली. नवाबाने काशीमबाजार येथील वखार ताब्यात घेऊन कलकत्त्यावर हल्ला केला. नवाबाच्या एवढ्या मोठ्या सैन्यानिशी कलकत्त्याचे मूठभर ब्रिटिश सामना करू शकत नव्हते. त्यांचा अधिकारी ब्रूक आपल्या सहकाऱ्यांशी कलकत्त्याच्या दक्षिणेस हुगळी नदीच्या मुखावर असलेल्या फुल्ट या ठिकाणी पळून जाऊन, तेथे आपल्या आरमारासह बंदोबस्तात थांबला. ब्रिटिशांचा पराभव झाल्याने नवाबाच्या सैन्यापुढे शस्त्रे ठेवली. नवाबाने काही इंग्रजांना युद्धकैदी म्हणून पकडले. 146 युद्धकैद्यांना 18 फूट लांब व 14.6 फूट रुंद असलेल्या खोलीत डांबण्यात आले. ही खोली म्हणजे अंधार कोठडी होती. परिणामी जून महिन्याच्या गरमीमुळे व प्राणवायूचा तुटवडा कमी पडल्याने त्यापैकी 123 कैदी मृत्युमुखी पडले. कलकत्त्याच्या या अंधारकोठडीच्या कारस्थानात नवाबाला जबाबदार धरण्यात आले. कंपनीने ही घटना उचलून धरून नबाबाविरुद्ध वातावरण तयार केले व इंग्रजांचे समर्थन मिळविले. कंपनीच्या प्रकारानुसार पुढील सात वर्ष बंगालच्या नबाबशी इंग्रजांचा जो संघर्ष चालला त्याच्या मुळाशी ही घटना होती. या घटनेमुळे कंपनी व नबाब यांच्यातील संघर्ष वाढला व त्यामधून प्लासीची लढाई उदभवली. कोलकाता शिवाय इंग्रजांच्या ढाका, बालासोर इत्यादी ठिकाणी वखारी होत्या त्याही सिराजउद्दौलाचा ताब्यात आल्या.

**कोलकाता पुन्हा इंग्रजांनी जिंकला:-**

कोलकत्ता इंग्रजांच्या हातून गेल्याची वार्ता मद्रास येथील ईस्ट इंडिया कंपनीच्या अधिकाऱ्यांना कळताच, त्यांनी रॉबर्ट क्लाइव्हच्या आणि वॅटसन च्या नेतृत्वाखाली आपले सैन्य कोलकात्याला पाठवले. जानेवारी 1757 मध्ये त्यांनी प्रारंभी कोलकाता परत जिंकून घेतले. आपल्या पराभवाचा कलंक पुसून काढण्याच्या हेतूने त्यांनी सगळीकडे आपला प्रभाव आक्रमक हालचालीतून निर्माण केला. नबाबाने इंग्रजांकडे तहासाठी बोलणी सुरू केली. इंग्रजांनी ज्या अटी त्यांच्या बाजूने मांडल्या त्या पुढीलप्रमाणे होत्या.

1)इंग्रजांचे झालेले नुकसान भरून निघावे

2) बंगाल प्रांतात इंग्रजांनी आपला सर्व कारभार पूर्वीप्रमाणेच करण्यास मिळावा.

3) इंग्रजांना त्यांच्या वसाहतीची तटबंदी करण्यास अनुमती मिळावी.

4) कोलकाता येथे स्वतःची टाकसाळ घालण्याची परवानगी इंग्रजांना असावी.

वरीलप्रमाणे कडक अटी असतानाही नवाबाने पहिल्या तीन अटी मान्य केल्या. परंतु इंग्रज आणि विशेषता रॉबर्ट क्लाइव्ह हा तह होण्यापेक्षा लढण्यासाठी अधिक उत्सुक होता. सिराजउद्दौला देखील इंग्रजांना धडा शिकविण्याच्या तयारीत होता. यातून इंग्रज व सिराजुद्दौला यांच्यात एक लढाई 5 फेब्रुवारी 1757 मध्ये झाली ज्यात दोन्ही बाजूचे बरेच लोक मृत्यमुखी पडले. या संघर्षानंतर सिराजउद्दोल्लाने इंग्रजांच्या वरील सर्व मागण्या मान्य केल्या. यालाच 'अलीनगरचा तह' म्हटले जाते.

**नवाब सिराजउद्दौला विरोधात इंग्रजांचे कारस्थान:-**

इंग्रजांना सिराजुद्दौलाची राजवट संपवायची होती आणि जेव्हा त्यांना त्याच्याच कारभारातील काही मंडळी त्याच्या विरोधात उभे राहण्यास तयार आहेत हे दिसल्यावर इंग्रजांनी फंदफितुरीचा आश्रय घेतला. या प्रकरणात त्यांना सिराजुद्दौलाच्या दरबारातील मिरजाफर हा उठाव करण्यास तयार असल्याचे लक्षात आले. त्याला सिराजुद्दौलाच्या जागी सुभेदार म्हणून बसविण्याचे आश्वासन इंग्रजांनी दिले.

मीरजाफर आणि इंग्रज यांच्यात झालेला गुप्त करार पुढीलप्रमाणे होता.

1)सिराजउद्दौला याने इंग्रजांना ज्या सोयी-सवलती हक्क दिले आहेत ते जशास तसे मीर जाफरने ठेवावेत आणि इंग्रजांबरोबर चांगले संबंध ठेवावेत.

2) फ्रेंच लोकांना बंगाल मधून हाकलून लावावे आणि त्यांची मालमत्ता इंग्रजांना द्यावी. ईस्ट इंडिया कंपनी आदींना बऱ्याच मोठ्या रकमा देण्याची तयारी मीर जाफरने दाखविली.

**प्लासीची लढाई:-**

सिराजउद्दौला याला मीरजाफर इंग्रजांना सामील झाल्याचे लक्षात आले. परंतु तरीही त्याला सेवेतून न काढता त्याच्याकडून निष्ठेचे आश्वासन घेतले. रॉबर्ट क्लाइव्ह आणि सिराजुद्दोला यांच्या सैन्यात प्लासी याठिकाणी 23 जून 17 57 रोजी लढाई झाली. या इंग्रजी सैन्याला विजय मिळून बंगालचा सुभेदार नवाब सिराजउद्दौला याचा पराभव झाला. सिराजुद्दोला पळून जात असताना पकडला जाऊन त्याचा वध करण्यात आला आणि 25 जून 1757 रोजी रॉबर्ट क्लाईव्हने बंगालचा नबाब म्हणून मिरजाफरची नियुक्ती केली. अशा प्रकारे बंगालचा नबाब आता ब्रिटिशांच्या हाती आला.

**प्लासीच्या लढाईचे महत्त्व:-**

मिरजाफर सारख्या स्वार्थी प्रवृत्तीच्या व्यक्ती मुळे इंग्रजांना प्लासीच्या युद्धात विजय मिळाला. प्लासी येथे घनघोर अशी लढाई झालीच नाही. त्यामुळे लष्करी दृष्ट्या या लढाईस फारसे महत्त्व नाही परंतु राजकीय दृष्ट्या या लढाईचे महत्त्वाचे स्थान आहे. प्लासीची लढाई इंग्रजांनी सैन्यबळावर आणि रणांगणावर जिंकली असे म्हणण्यापेक्षा ती कपटकारस्थाने जिंकली असे म्हणणे योग्य ठरेल. अशा या लढाईचे महत्त्व पुढीलप्रमाणे

**1) ब्रिटिशांच्या भावी साम्राज्याचा पाया घातला:-**

प्लासीच्या युध्दानंतर मीरजाफर जरी गादीवर बसला तरी राजकारणाची सर्व सूत्रे कंपनीच्या हातात होती. कालांतराने इंग्रजांनी बंगाल आपल्या ताब्यात आणला. बंगालमध्ये अनेक सवलती मिळविल्या. बंगालच्या अंतर्गत भागात कंपनीला वखारी सुरू करण्यास परवानगी मिळाली. इंग्रजांचा तेथे आर्थिक साम्राज्यवाद सूरु झाला व ब्रिटिशांच्या भावी साम्राज्याचा पाया घातला गेला.

**2) ब्रिटिशांना प्रचंड संपत्ती मिळाली:-**

या विजयाने ब्रिटिशांना प्रचंड संपत्ती मिळाली. रॉबर्ट क्लाइव्ह ने मिरजाफरकडे जवळपास 1 कोटी 26 लाख 10,000हजार 750 रुपये ची मागणी केली. याशिवाय इंग्रजांनी आपली नुकसान भरपाई तसेच बक्षीस म्हणून 60, 29000हजार200 रुपये ही रक्कम इंग्रजांनी

घेतली.

**3) ब्रिटिशांकडे दिवानीचे व हक्क व इतर फायदे:-**

ब्रिटिशांच्या विजयामुळे बंगाल हा समृद्ध प्रांत त्यांच्या वर्चस्वाखाली आला. कंपनीचा व्यापार वाढला. प्रचंड लूट मिळाली. पुढील काळात दिवानीचे हक्क मिळाल्याने फारसा व्यापार न करता कंपनीला वार्षिक नफ्याची तरतूद झाली. शिवाय कंपनीच्या व्यापारावर कोणतीच बंधने राहिली नाहीत.

**4)ब्रिटीशांचा व्यापार वाढला:-**

प्लासीच्या विजयानंतर कंपनीच्या ब्रिटिश अधिकाऱ्यांना बंगालमध्ये आपल्या व्यापारासाठी मुक्तद्वार मिळाले. त्यांचा खासगी व्यापार भरभराटीस आला. त्यांच्या व्यापारात मोठी वाढ होऊ लागली.

**5) बंगालचा नवाब इंग्रजांच्या हातातील बाहुले बनला:-**

इंग्रजानी मीरजाफरला नवाब केले. इंग्रजांचे बंगाल मध्ये महत्त्व वाढले ते बंगालमध्ये किंगमेकर बनले व बंगालचा नवाब मीरजाफर इंग्रजांच्या हातचे बाहुले बनला. त्याला ज्या वेळी स्वसंरक्षणाची गरज भासली त्यावेळी रॉबर्ट क्लाइव्ह ची मदत घ्यावी लागली. इथून पुढे बंगालच्या नाबाबांना इंग्रजांच्याच नियंत्रणाखाली कारभार करावा लागला.

**6) रॉबर्ट क्लाइव्ह बंगालचा गव्हर्नर:-**

प्लासीच्या लढाईपूर्वी रॉबर्ट क्लाइव्ह एक मद्रास गव्हर्नर चा नोकर म्हणून बंगाल ला रवाना झाला होता. परंतु प्लासीच्या विजयामुळे कंपनीने त्यांची नियुक्ती बंगालचा गव्हर्नर म्हणून केली.

**मिरजाफर बंगालचा नवाब बनला:-**

बंगालचा नवाब म्हणून सिराजउद्दौलाच्या जागी मिरजाफरला इंग्रजांनी बसविले आणि याबदल्यात इंग्रजांनी विविध लोकांना जी बक्षीसे द्यावयाची होती त्या रकमेची मागणी केली. एवढे पैसे मिरजाफर जवळ नव्हते. तेव्हा काही रक्कम रोख व बाकी रक्कम हप्त्याने फेडावी असे ठरले. मिर जाफर हा सुद्धा व्यसनी व विलासी वृत्तीचा होता. मुख्य म्हणजे त्याला बंगालच्या सत्तेवर इंग्रजांनी आणले असल्यामुळे इंग्रज आपल्यापेक्षा वरचढ ठरले असून आपल्याला दुय्यम स्थान प्राप्त झाले आहे याची जाणीव मिरजाफरला झाली व त्यामुळे तो उद्विग्न झाला. इंग्रजांना प्रचंड प्रमाणात पैसा दिल्यामुळे त्यांना मदत करणाऱ्या इतर व्यक्तींना देण्यासाठी मिरजाफर जवळ पैसे शिल्लक राहिले नाहीत, परिणामी त्याच्या जवळची मंडळी त्याच्यावर नाराज झाली. इंग्रजांना पैसा देण्यासाठी मीरजाफरने कोलकात्याच्या दक्षिणेकडील सव्वादोन लक्ष पौंड उत्पन्नाचा प्रदेश जानेवारी 1758 मध्ये कंपनीला दिला. तसेच बिहारमधील सोन्याच्या व्यापाराची मक्तेदारी रॉबर्ट कलाइव्हच्या मागणीवरून मीरजाफरने कंपनीला दिली. 1760 च्या फेब्रुवारीमध्ये रॉबर्ट क्लाइव्ह इंग्लंडला परत गेला. मात्र जाण्यापूर्वी त्याने बंगालमध्ये इंग्रजी सत्ता खऱ्या अर्थाने प्रस्थापीत करण्याची महत्त्वपूर्ण कामगिरी पार पाडली होती.

**मीर कासिम बंगालचा नवाब:-**

रॉबर्ट क्लाइव्ह इंग्लंडला गेल्यानंतर बंगालमधील ईस्ट इंडिया कंपनीच्या कारभाराची सूत्रे हॉलवेल ज्याच्याकडे होती. कलकत्त्याच्या अंधार कोठडीच्या प्रकरणाचा सूड घेण्याची हॉल वेलची इच्छा होती व मिरजाफर याला नवाब पदावरून दूर करण्याचा त्याचा विचार होता. मधल्या काळात मोगल व इंग्रजांनी मिरजाफरला काढून टाकून त्याच्या जागी मीरमोहम्मद कासिम खान ऊर्फ मीरकासीम याची नेमणूक करण्याचे ठरविले. मीरकासीम हा मिरजाफरचा जावई होता. इंग्रजांनी त्याच्याशी एक करार केला तो पुढील प्रमाणे

1)इंग्रजांनी मीरजाफरच्या जागी बंगालच्या सुभेदारीवर मीरकासीम ची नेमणूक करावी.

2)यासाठी फौजेसह लागेल ती मदत इंग्रजांनी करावी ज्याच्या मदतीबद्दल मीरकासीमने इंग्रज फौजेच्या खर्चासाठी बरद्वान गाव आणि मिदनापूर हे परगणे कायमसाठी इंग्रजांना द्यावेत.

3) 4 वर्षे काळासाठी सिलेट प्रांतातील तुला नवाबाने इंग्रजांना घेऊ द्यावा.

4)मीर कासीमने गव्हर्नर आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांना काही लाखांच्या रकमा बक्षीस म्हणून द्याव्यात.

मीरकासीमशी अशा करार केल्यानंतर ब्रिटिशांनी मिरजाफरला नवाब पदावरून काढून टाकून त्याच्या जागी बंगालचा नबाब म्हणून मीर- कासीमची नियुक्ती केली. पूर्णिया व रंगपुर चा शासक म्हणून उत्कृष्ट कार्य केलेला मीरकासीम हा अलीवर्दीखान नंतरचा सर्व नबाबात सर्वात योग्य होता. त्याने कंपनीचे स्वामित्व झुगारून द्यावयाचे ठरविले. इंग्रजांचा हस्तक्षेप टाळण्यासाठी आपली राजधानी मुर्शिदाबाद वरून मुंगेर येथे हलविली. कारभारातील उधळपट्टी व भ्रष्टाचारास आळा घालून खजिना भरून काढला. पाश्चात्त्य धर्तीवर कवायती फौजाही उभारण्यास सुरुवात केली. 1757 मध्ये बंगालला स्थापन झालेली कंपनीची सत्ता त्याला समाप्त करावयाची होती. अशा स्थितीत मीरकासीम नबाब पदी फार काळ टिकणे शक्य नव्हते. मीरकासीमने इंग्रजांच्या वर्चस्वाला आळा घालण्यासाठी व व्यापारात सुधारणा करण्यासाठी जकात माफीचे धोरण ठेवले. यामुळे भारतीयांचा व्यापार वाढला मात्र इंग्रजांचा खाजगी व्यापार बसला. यातूनच युद्धजन्य परिस्थिती निर्माण होत गेली. कंपनीच्या अधिकाऱ्यांच्या बेकायदेशीर व्यापाराला आळा बसला. त्यामुळे इंग्रज संतप्त झाले त्यांनी मीरजाफरला पुन्हा नबाब करण्याचे जाहीर केले. परंतु मीर कासीम ने त्याची दखल न घेतल्याने इंग्रजांनी त्याच्यावर फौज पाठवली. मीरकासिम व इंग्रज यांच्यात 10 जून 1764 मध्ये युद्ध सुरू झाले. त्यात नवाब मीरकासिमचा निभाव लागला नाही. मिरकासीमने चिडून जाऊन पकडलेल्या इंग्रज कैद्यांना ठार केले आणि अयोध्येच्या नबाबाकडे आश्रयास गेला.

**बक्सारची लढाई:-**

22 ऑक्टोबर 1764 अयोध्येला पळून गेलेल्या मीरकासिमने अयोध्येचा नवाब आणि मोगल सत्तेचा वजीर यांची भेट घेतली. दिल्लीतील सत्तेवरून परागंदा झालेला मोगल बादशहा शहा आलम त्यावेळी अयोध्या येथेच मुक्काम आला होता. मीरकासिमने त्यांना इंग्रज विरोधात संघर्ष करण्यासाठी तयार करून त्या तिघांची एक आघाडी तयार केली. एका बाजूला पदच्युत नवाब मीर कासीम, मोगल बादशहा शहा आलम व अयोध्येचा नबाब शुजाउद्दौला यांची फोज तर दुसऱ्या बाजूला ब्रिटिशांचा सेनानी मेजर मन्रो याने सात हजार सैन्यानिशी चाल केली. ही इतिहास प्रसिद्ध लढाई 23 ऑक्टोबर 1764 मध्ये पाटणा जवळच्या बक्सार येथील मैदानावर झाली. इंग्रज सेना अधिकारी मेजर मन्रो याने शत्रूसैन्याचा पूर्ण पराभव केला. या लढाईत इंग्रजांची फौज आधुनिक प्रकारचे लष्करी शिक्षण घेतलेली होती. तसेच त्यांच्याकडे उत्तम प्रकारच्या 22 तोफा होत्या. पराभूत झालेल्या अयोध्येच्या नबाबाकडून इंग्रजांनी सोनार व अलाहाबादचे किल्ले जिंकून घेतले. सुजाने इंग्रजाबरोबर तह केला. मीरकासिम कायमचा परागंदा झाला. त्याचा 1777 मध्ये दिल्ली येथे मृत्यू झाला.

**बक्सारच्या लढाई चे परिणाम व महत्त्व:-**

1)बक्सार च्या लढाईत इंग्रजांचा विजय झाल्याने मोगलांची सत्ता मोडकळीस येऊन पूर्ण हिंदुस्थानात इंग्रजांचे वर्चस्व कायम झाले. तसेच इंग्रजांच्या भावी साम्राज्याचा पाया घातला गेला. 2)बक्सर चा विजय हा इंग्रजांच्या शस्त्र सामर्थ्याचा व मुत्सद्देगिरीचा होता हे स्पष्ट झाले.

3) ब्रिटिशांची भारतातील राजकीय प्रतिष्ठा वाढली. लष्करी दबदबा निर्माण झाला.

4) बंगाल प्रांतावर ब्रिटिशांचे वर्चस्व निर्माण झालेच त्याशिवाय अयोध्येचे राज्य ही ब्रिटिशांच्या वर्चस्वाखाली आले व शेवटी अत्यंत महत्त्वाचे म्हणजे दिल्लीचा बादशहा इंग्रजांच्या ताब्यात आला.

5)बंगालचा सुभेदार इंग्रजांचा पेन्शनर बनला.

6) ईस्ट इंडिया कंपनीला बंगाल बिहार ओरिसा या प्रांताची दिवाणी हक्क मिळाले. हे दिवाणी हक्क पुढील काळात कंपनीला फार उपयोगाचे ठरले.

## म्हैसूर

चौदाव्या शतकात विजयनगर साम्राज्य उदयास आले. म्हैसूरचा प्रदेश त्यात समाविष्ट होता. 1565 मध्ये तालिकोट लढाईत पराभूत झाल्याने विजयनगर साम्राज्य नष्ट झाले. अठराव्या शतकातील भारतातील अस्थिर राजकीय परिस्थितीने अनेक साहसी वीरांना आपले भविष्य घडविण्याची संधी मिळवून दिली. यावेळी म्हेसुरमध्ये वाडीयार घराण्याची सत्ता होती. पण तेथील राजा चिक्क कृष्णराज विलासी असल्याने राजाची सत्ता मुख्य सेनापति देवराज आणि प्रधान नंजराज ह्या दोन भावाच्या हाती होती. अशा पार्श्वभूमीवर हैदरअलीचा उदय झाला. हैदरअलीचा जन्म 1722 मध्ये झाला. लहानपणापासून तो पराक्रमी व धाडसी होता. पुढे त्यात महत्त्वाकांक्षा आणि मुत्सद्दीपणा यांची भर पडली. दक्षिणेत सुरू असलेल्या इंग्रज, फ्रेंच, मराठे आणि निजाम संघर्षात म्हैसूरचे राज्य ही उतरले गेले. अशातच मैसूरवर मराठ्यांची सतत आक्रमणे सुरू झाली. परिस्थितीचा सामना करण्यात चिक्क कृष्णराज आणि त्यांचे प्रमुख सहकारी असफल ठरले. योग्य त्या संधीची वाट पाहत असलेल्या हैदरअलीने त्या सर्वांना कैदेत टाकले आणि म्हेसुरची सत्ता आपल्या हाती घेतली. दक्षिण भारतात सुरू असलेल्या संघर्षातून हैदरअलीला आधुनिक युद्धकलेचे व प्रशिक्षित सेनेचे महत्त्व कळून आले. मराठ्यांना रोखून धरण्यासाठी जलद हालचाली करणाऱ्या शक्तिशाली घोडदलाची आवश्यकता होती तर निजामाला जवळ असलेल्या फ्रेंच प्रशिक्षित सैन्याला तोंड देण्यासाठी तेवढ्याच ताकदीचा तोफखाना आवश्यक होता. शस्त्रांच्या बाबतीत युरोपियनांनी केलेल्या प्रगतीचे हैदरला ज्ञान होते. म्हणूनच त्याने फ्रेंचाच्या मदतीने डीनडीगल येथे एक शस्त्रनिर्मितीचा कारखाना काढला व आपल्या सैन्याला पाश्चिमात्य पध्दतीचे युद्ध शिक्षण दिले. त्याचबरोबर तो मुत्सद्दीपणाचे डावपेच खेळू लागला. 1761 ते 7063 या अल्पकाळात त्याने होस्कोठ, तोटाबेलापूर, शिरा, बेदुर इत्यादी महत्त्वाची ठिकाणं जिंकली.

इंग्रजांचा बंगालमधील राज्यविस्तार काही अंशी सुलभ व कमी जोखमीचा झाला. कारण या राज्य विस्तारासाठी बंगालमधील काही व्यापारी व असंतुष्ट सरदार लोकांनी त्यांना मदत केली. परंतु म्हैसूरमधील राज्यविस्तार अधिक कठीण झाला. त्यासाठी इंग्रजांना मैसूर मध्ये प्रखर विरोधाला तोंड द्यावे लागले. इंग्रजांचा म्हैसूरमधील प्रादेशिक प्रवेश ही प्रक्रिया लॉर्ड वॉरेन हेस्टिंग्स, लॉर्ड कॉर्नवालीस व लॉर्ड वेलस्ली या तीन गव्हर्नर जनरलच्या काळात झाली. 1767 ते 1789 म्हणजे जवळजवळ 22 वर्ष मैसूर मध्ये इंग्रजांना आपला प्रभाव निर्माण करण्यासाठी खर्च करावा लागला त्यावेळी दक्षिणेत मराठे, निजाम, हैदर यांच्या सत्ता प्रभावीपणे अस्तित्वात होत्या आणि इंग्रजांनाही मैसूर मध्ये प्रवेश हवा होता. त्यामुळे दक्षिणेच्या राजकारणात मित्राचे शत्रू व शत्रुचे मित्र झाल्याचे दिसून येते.

**इंग्रज व हैदर यांच्यातील संघर्षाची कारणे:-**

इंग्रजाच्या दक्षिणेतील हालचाली हैदरला अस्वस्थ करणाऱ्या होत्या. इंग्रजांनी निजामाला संभाव्य म्हैसूरच्या संघर्षामध्ये तटस्थ राहण्यासाठी गुंटूर प्रांत देण्याचे व नागपूरकर भोसले यांनाही तटस्थतेसाठी अशीच काही आश्वासने दिली होती. परंतु त्या आश्वासनाची पूर्तता न झाल्याने निजाम व नागपूरकर भोसले हैदरच्या बाजूला झुकले. त्यामुळे हैदर व इंग्रज यांच्यातील संबंध बिघडले. त्याशिवाय त्यांचे संबंध बिघडण्यास खालील कारणे कारणीभूत होती.

**1) हैदरला फ्रेंचाकडून सहाय्य:-**

फ्रेंच हे इंग्रजाचे विरोधक होते. हैदर फ्रेंच राज्यकर्त्याकडे वळला. फ्रेंच यांनी हैदरला सर्व प्रकारची मदत दिली. फ्रेंचांनी हैदरला महिन्याला दहा हजार रुपये नजराना देण्याचे मान्य केले. शिवाय तीगड व सारे हे दोन किल्ले दिले. याशिवाय हैदरने इंग्रजांना कर्नाटकातून हाकलून लावले तर त्यांना त्रिचनापल्ली, मदुराई व तिनवेल्ली हे प्रदेश देण्याचे मान्य केले. ही फ्रेंचांची हैदरला सहाय्य करण्याची नीती इंग्रजांना धोकादायक वाटत होती.

**2) हैदरचा मराठयाबरोबर तह:-**

इंग्रजांनी आपल्या विरोधात एकत्र येणाऱ्या हैदर व मराठ्यांचा बंदोबस्त करण्याचा प्रयत्न केला. इंग्रजांनी मेजर मुरच्या नेतृत्वाखाली हैदरवर सैन्य पाठविले. परंतु हैदरने त्याचा पराभव केला. इंग्रजाविरुद्ध हैदरला मदत करणाऱ्या फ्रेंच यांचा काटा काढण्यासाठी त्यांच्या ताब्यातील पांडिचेरी वर हल्ला करून 1761 मध्ये ते इंग्रजांनी जिंकून घेतले. त्यामुळे त्यांची हैदरला मिळणारी मदत कमी झाली. मात्र हैदरने पेशवा माधवराव बरोबर तह करून इंग्रजांना शह देण्याचा प्रयत्न केला. त्याची दखल घेणे इंग्रजांना भाग होते.

**3) परस्परांच्या शत्रूंना मदत:-**

कर्नाटकात हैदर व कर्नाटकाचा नवाब मोहम्मद अली यांच्यात संघर्ष सुरू झाला होता. इंग्रजांनी हैदर विरुद्ध मोहम्मदअली ला लष्करी मदत दिली. तेव्हा हैदराने मोहम्मदअलीचा भाऊ युसूफ खान व त्यांचे शत्रू राजासाहेब व चंद्रसाहेब यांना सशस्त्र मदत दिली.

**4)इंग्रज निजाम मैत्रीचा तह:-**

इंग्रजांनी म्हैसूरच्या हैदर विरुद्ध हैदराबादच्या निजामाला परस्परांच्या विरोधात उभे करण्याचे प्रयत्न केले. त्यातून 1767 मध्ये इंग्रज व निजाम मैत्रीचा तह झाला. या तहानुसार इंग्रजांनी निजामाला पाच लाखाचा नजराना व गुंटूर सह तीन जिल्हे देण्याचे कबूल केले.

**5) बालाघाट प्रदेश घेण्याचा प्रयत्न:-**

बालाघाटचा प्रदेश हैदरच्या ताब्यात होता. इंग्रजांनी हा प्रदेश घेण्यासाठी हैदर विरुद्ध हालचाली सुरू केल्या. निजामाने हैदरला मदत न करता तटस्थ राहावे. याबद्दल निजामाला सात लाखाचा नजराणा व दिवानीचे अधिकार देण्याचे इंग्रजांनी कबूल केले. अशा परिस्थितीमुळे हैदर व इंग्रजी युद्ध अटळ होते.

दक्षिणेत राज्यविस्तार करताना इंग्रजांना हैदर व त्याचा पुत्र टिपू सुलतान यांच्याविरुद्ध चार युद्ध करावी लागली त्यांना. म्हैसूरची युद्ध म्हणतात. त्या युद्धांचा थोडक्यात आढावा खालील प्रमाणे घेता येईल.

**पहिले म्हैसूर युद्ध (1767 ते 1769)**

1767 मध्ये कर्नल स्मिथ व निजाम यांनी म्हैसूरवर हल्ला केला. या हल्ल्याने पहिले इंग्रज व हैदर युद्ध सुरू झाले. इंग्रजांनी निजामाला दिलेली मदत हेच या पहिल्या म्हैसूर युद्धाचे तात्कालिक कारण होते. हैदर हा देखील इंग्रजा इतकाच मुत्सद्दी होता. त्याने मराठ्यांना 20 लाखाचा नजराना देण्याचे आश्वासन देऊन, इंग्रजांविरुद्ध त्यांची मदत मिळविली. एवढेच नव्हे तर निजामाला देखील इंग्रजांपासून वेगळे केले. या युद्धात मैसूरचा टिपूने आपल्या कौशल्याची व शौर्याची चुणूक दाखविली. मद्रासच्या इंग्रजांवर हल्ला करून त्यांना घाबरवून सोडले. परिस्थितीचे गांभीर्य पाहून इंग्रजांनी हैदर पुढे शरणागती पत्करली.

14 एप्रिल 1769 ला पहिले इंग्रज हैदर युद्ध संपले. त्यावेळी झालेल्या **तहातील ठळक कलमे** खालीलप्रमाणे:-

1) इंग्रज व हैदर पुत्र टिपूने घेतलेले प्रदेश ज्याचे त्यांना परत करावेत.

2) इंग्रज व हैदरवर तिसऱ्याने आक्रमण केल्यास दुसऱ्याने तिसऱ्या विरुद्ध मदत करावी.

या कलमांद्वारे हैदरने मराठ्यांविरुद्ध इंग्रजांची मदत मिळेल अशी व्यवस्था केली. तथापि पुढे असे घडल्याचे दिसत नाही. उलट इंग्रजांनी मराठ्यांची मदत घेऊन कर्नाटकाच्या राजकारणात हैदरला एकटे पाडण्याचे प्रयत्न केले. 1778 मध्ये पुण्यात नारायणरावाच्या वधानंतर बारभाई कारस्थानाला सुरुवात झाली. त्यावेळी गव्हर्नर जनरल लॉर्ड हेस्टिंगने मराठया बरोबर पुरंदरचा तह करून हैदर विरुद्ध मराठ्यांची मदत मिळविली. या विजयामुळे हैदरची ताकद वाढली तर पराभवाने बंगाल विजेत्या इंग्रजांना नामुष्की पत्करावी लागली.

**दुसरे म्हैसूर युद्ध:- (1780 ते 1784)**

दुसरे म्हैसूर युद्ध गव्हर्नर जनरल लॉर्ड वॉरन हेस्टींगच्या काळात झाले. युद्धाची पार्श्वभूमी पुढील घटनांनी तयार झाली.

**युद्धाची कारणे**

1)1771 मध्ये मराठ्यांनी हैदरवर स्वारी केली. सन 1769 च्या तहात ठरल्याप्रमाणे इंग्रज हैदरच्या मदतीला गेले नाहीत. हैदरने इंग्रजांवर विश्वासघाताचा आरोप केला.

2)तोफा, बंदुका, दारुगोळा इत्यादी साधन सामुग्री हैदरला माहे बंदरातून मिळत होती. परंतु इंग्रजांनी माहे बंदर जिंकून घेतले. फ्रेंचाच्या ताब्यातील हे ठिकाण इंग्रजांनी घेऊन हैदरला आव्हान दिले.

3)अमेरिका इंग्लंड पासून स्वतंत्र झाली.(1776) त्यामुळे इंग्लंडच्या पार्लमेंटने भारतावर आपले लक्ष केंद्रित केले.

लॉर्ड वॉरन हेस्टिंग्जने मुंबई इलाख्यात मराठ्यांविरुद्ध युद्ध पुकारल्यामुळे मराठे व हैदर इंग्रजांच्या विरोधात परस्परांच्या जवळ येऊ लागले. इंग्रजांच्या दगाबाजीला कंटाळलेला निजाम सुद्धा हैदरकडे झुकला. तसेच नागपूरकर भोसले ही हैदरला मिळाला. अशाप्रकारे मराठे, निजाम, हैदर, भोसले विरुद्ध इंग्रज असा संघर्ष कर्नाटकात सुरू झाला. इंग्रजांच्या विरोधात हे दुसरे म्हैसूर युद्ध सुरू झाले. प्रारंभी हैदरच्या आक्रमक चढायामुळे इंग्रजांना पळ काढावा लागला. इंग्रजांच्या ताब्यात असलेल्या प्रदेशातील लोकांनाही पळ काढावा लागला. त्यामुळे खेडी ओस पडली. हैदरने पोर्टोनोव्हो हे इंग्रजांचे ठिकाण जिंकून घेतले. लॉर्ड वॉरेन हेस्टिंगने परिस्थितीचे गांभीर्य ओळखले आणि हळूहळू निजाम व भोसले यांना हैदरपासून अलग केले.

ह्याच वर्षी एक महत्वाची घटना घडली 17 मे 1782 रोजी हैदरअलीला विश्वासात न घेता मराठ्यांनी इंग्रजांशी सालबाईचा तह करून त्यांच्यापुरते हे युद्ध समाप्त केले. त्यामुळे संतापलेल्या व एकट्या पडलेल्या हैदरने युद्ध न थांबविता सुरूच ठेवले. एवढेच नव्हे तर वॉरेन

हेस्टिंगने पाठविलेल्या जनरल सर आयरकुट या इंग्रज सैनानीचा जबर पराभव केला. 7 डिसेंबर 1782 रोजी हैदरअलीचा कर्करोगाने मृत्यू झाला. हैदरअलीच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा टिपू सुल्तान याने आपल्या पित्याचे धोरण पुढे चालविले. म्हणून इंग्रजांच्या मदतीसाठी मुंबईहुन जनरल मॅथुअजला पाठवण्यात आले. जनरल मॅथ्यूजने पश्चिम तटावरील मंगलोर घेऊन बेदनूरही जिंकून घेतले. तेव्हा टिपूने पित्याचे अनुकरण करीत इंग्रजांना जबरदस्त मार देत त्यांच्यापासून मंगलोर व बेदनुर हिसकावून घेतले आणि शेकडो इंग्रजांना बंदी बनविले. शेवटी परस्परांमध्ये मंगलोरचा तह होऊन 11 मार्च 1784 हे द्वितीय युद्ध समाप्त झाले. तहानुसार एकमेकाचे प्रदेश व युद्धकैदी परत करण्यात आले.

**तिसरे म्हैसूर युद्ध (1790-1792):-**

मैसूरचे तिसरे युद्ध लॉर्ड कॉर्नवालीसच्या कारकिर्दीत झाले. हे युद्ध इंग्रज व टिपू सुलतान यांच्यामध्ये झाले. इंग्रजांच्या दृष्टीने मंगलोरच्या तहाद्वारे समाप्त झाले. मंगलोरचा तह म्हणजे पुढील तयारीसाठी मिळालेला वेळ होता. खरे तर 1784 च्या कायद्यात असे म्हटले होते की, कंपनी यापुढे कोणताही नवीन प्रदेश जिंकण्याचा प्रयत्न करणार नाही. तरीही मराठे आणि निजाम टिपूच्या विरोधात आहेत ही संधी साधून लॉर्ड कॉर्नवॉलिसने 1790 मध्ये टिपू विरुद्ध इंग्रज, मराठे आणि निजाम असा संघ तयार केला. हैदर प्रमाणेच टिपू ही इंग्रज द्रष्टा होता. त्याला इंग्रजांशी संघर्ष करावयाचा होता. त्याने फ्रान्स व तुर्कस्थान बरोबर सलोखा करून मदतीसाठीसाठी आपले वकील पाठवले. परंतु त्याचा काहीही उपयोग झाला नाही.

त्रावणकोरच्या राजाने डच लोकांपासून कोचीन संस्थानातील काही प्रदेश विकत घेण्याचा प्रयत्न चालविला. कोचीन संस्थान टिपूच्या संरक्षनाखालचे असल्याने लॉर्ड कॉर्नवलीसचा हा प्रयत्न स्वाभाविकच टिपूला आपल्या कार्यक्षेत्रात हस्तक्षेप वाटला. दुसरी गोष्ट म्हणजे म्हैसूर राज्यातील बंडखोरांनी त्रावणकोर चा आश्रय घेतला आणि त्या बंडखोरांची टिपूने मागणी करताच त्याला त्रावनकोरच्या राजाने स्पष्ट नकार दिला. वरील दोन्ही घटनांनी संतप्त झालेल्या टिपूने श्त्रावणकोरवर आक्रमण केले. यापूर्वी 1784 मध्ये इंग्रज व त्रावणकोर मध्ये तह होऊन त्यात एकमेकांना मदत करण्याचे कलम होते. त्याप्रमाणे इंग्रज श्त्रावणकोरच्या मदतीला धावून आले. त्याच वेळी टिपू विरुद्ध इंग्रज, मराठे व निजाम असा संघ झालेला होता. या शक्तिशाली संघाविरुद्ध एकट्या टिपूला टक्कर द्यावयाची होती. अशा स्थितीत कॉर्नवालिसने एका मोठ्या सैन्यासह म्हेसुरवर आक्रमण केले. वेल्लोर मार्गे बंगलोर वर चालून आला. मार्च 1791 मध्ये बंगलोर जिंकून टिपूची राजधानी श्रीरंगपट्टन जवळ येऊन पोहोचला. टिपूने कडवा प्रतिकार केला पण मुंबईचे सैन्य, मराठे आणि निजामाचे ही सैन्य आल्याने टिपूची ताकद कमी पडू लागली. परिणामी त्याने श्रीरंगपट्टनमचा तह करून हा संघर्ष थांबविला.

**श्रीरंगपट्टणम तहातील कलमे:-**

1)टिपूचे अर्धे राज्य इंग्रजांना मिळाले त्यातील काही प्रदेश त्यांनी मराठे व निजामाला दिले. 2)मराठ्यांना तुंगभद्रेच्या उत्तरेकडील प्रदेश आणि निजामाला कृष्णा व येणार नद्यांमधील प्रदेश मिळाला. व इंग्रजांना मलबार दिंडीगल व बारामहाल हे जिल्हे मिळाले.
3) युद्धाचा खर्च म्हणून टिपूकडून तीन कोटी 30 लाख रुपये इंग्रजांना मिळाले.
4) इंग्रजांच्या पकडलेल्या युद्ध कैद्यांची सुटका करावी लागली. 1756 च्या श्रीरंगपट्टण तहाची योग्य अंमलबजावणी व्हावी म्हणून टिपूला आपली दोन मुले इंग्रजांच्या कडे ओलीस ठेवावी लागली.

ह्या युद्धात टिपूचे मोठे नुकसान झाले आणि मोठ्या प्रयासाने तो आपले राज्य वाचू शकला. या तहामुळे म्हैसुरच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाला.

**चौथे म्हैसूर युद्ध:-(1799)**

चौथे इंग्रज-म्हैसूर युद्ध लॉर्ड वेलस्लीच्या काळात झाले. लॉर्ड कॉर्नवालीस नंतर 1798 मध्ये लॉर्ड वेलस्लीची गव्हर्नर जनरल म्हणून नियुक्ती झाली. तिसऱ्या इंग्रज-म्हैसूर युध्दात इंग्रजांनी टिपूचा पराभव केला होता. त्यामुळे म्हैसूरचे आर्थिक व सामाजिक नुकसान झाले होते. त्याचा सूड घेण्याची टिपूला आत्यंतिक इच्छा होती. त्या दृष्टीने इंग्रजांविरुद्ध त्याने युद्धाची तयारी सुरू केली. त्यासाठी त्याने काबुल, कॉन्स्टँटिनोपल, अरेबिया व मॉरिसस इत्यादी दूरच्या ठिकाणी सुद्धा इंग्रजांविरुद्ध मदत मिळविण्यासाठी आपले प्रतिनिधी पाठवून प्रयत्न केले होते. फ्रान्समधील जॅकॉबियन पक्षाचे समर्थनही मिळविले होते. तसेच 1799 मध्ये इजिप्त मध्ये असणाऱ्या नेपोलियन बोनापार्टशी

संपर्क साधला होता आणि डच लोकांच्या मदतीने आपली कवायती फौज ही तयार केली होती. त्यामुळे चौथे इंग्रज-म्हैसूर युद्ध अपरिहार्यच होते. लॉर्ड वेलस्ली गव्हर्नर जनरल म्हणून भारतात आल्यानंतर त्यांने टिपूच्या हालचाली पाहिल्या व टिपू हाच इंग्रजांचा धोकादायक शत्रू आहे याची खात्री त्याला पटली. टिपूचा विनाश घडवून आणण्यासाठी त्याने सिद्धता केली. इंग्लंड वरून मदत मिळवली. या वेळी मराठ्यांनी लॉर्ड वेलस्लीला दाद दिली नाही. परंतु निजामाने तैनाती फौजेची पद्धत स्वीकारली होती त्यामुळे तो इंग्रजांबरोबर सहभागी झाला. लॉर्ड वेलस्लीने टिपूला एकटे पाडण्यासाठी निजामाशी मैत्रीचा तह केला. मराठ्यांनाही टिपूच्या प्रदेशांपैकी अर्धा भाग देण्याचे वचन देऊन त्याने टिपू इंग्रज संघर्षात मराठ्यांना तटस्थतेची भूमिका घेण्यास राजी केले. टिपूच्या मांडलिक राजांना टिपूपासून फोडण्याचे प्रयत्न वेलस्लीने केले. चौथ्या म्हैसूर युद्धास मार्च 1799 मध्ये प्रारंभ झाला. जनरल हॅरिष व ऑर्थर वेलस्ली यांच्या इंग्रजी फौजेने एका बाजूने व जनरल स्टुअर्टने पश्चिमेकडून मैसूर वर हल्ला चढविला. सेदाशिर व मलवली येथे टिपूच्या सैन्याचा पराभव झाला. टिपूने श्रीरंगपट्टनमच्या किल्ल्याचा आश्रय घेतला. इंग्रज सैन्याने किल्ल्याला वेढा दिला. अखेर पराक्रमाची शर्थ करीत 4 मे 1799 रोजी टिपू धारातीर्थी पडला. किल्ला इंग्रजांच्या ताब्यात आला आणि म्हैसूर राज्याचे स्वातंत्र्य समाप्त झाले. टिपूच्या कुटुंबीयांना वेल्लोरच्या किल्ल्यात बंदिस्त करण्यात आले.टिपूचा मुलगा इंग्रजांना शरण आला.

इंग्रजांनी म्हैसूरच्या गादीवर हिंदू वाडीयर या घराण्यातील अल्पवयीन कृष्णराज या मुलास बसविले. तो अल्पवयीन असल्याने त्याच्या सहाय्यासाठी टिपूचा दिवाण पूर्णय्या यास ठेवण्यात आले. मैसूर मध्ये तैनाती फौज ठेवली होती. त्यांच्या राहण्याची व खर्चाची व्यवस्था करण्यात आली. श्रीरंगपट्टनच्या तहानुसार कन्नड, कोईमतूर, बेनाड, धारापुरम व मैसूरचा सागरी किनारा इंग्रजांनी आपल्या साम्राज्यात विलीन केला. इंग्रज राज्याच्या सीमा दक्षिण टोकाला. सलगपणे पूर्व व पश्चिम सागरांना भिडल्या. अशाप्रकारे ब्रिटिशांनी म्हैसूर वर वर्चस्व प्रस्थापित केले व कंपनीच्या सत्तेला गेल्या अनेक वर्षापासून आव्हान देणारे म्हैसूरचे राज्य संपुष्टात आले.